# दैनिक अतुल्य महाराष्ट्र

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ : मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उप संपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे




छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन..!
मातीच्या कणावर आणि विश्वासाच्या प्रमाणावर, राज्य करणारा राजा म्हणजे राजा शिवछत्रपती!
पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन..!


बीड- महाराष्ट्र | बीड, गुरुवार, दि. 3 एप्रिल 2025 | अंक क्र. 307 | वर्षे 2 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4




# आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत : अजित दादा पवार

बीड प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यामध्ये सध्या समाजामध्ये जाती-जातीमध्ये निर्माण झालेला दुरावा संपवण्याचे काम सर्वांना मिळून एकत्र येऊन करावे लागणार आहे असे अजित पवार म्हणाले. पक्षांमध्ये घेणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या फार मोठी आहे मात्र कार्यकर्त्यांची निवड करताना त्यांचे रेकॉर्ड तपासणे गरजचे आहे असेही अजित पवार म्हणाले. ते बीड येथे आयोजित युवक मेळाव्यात ते बोलत होते. या कार्यक्रमास राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण हे अध्यक्षस्थानी होते. अलीकडे एक नवीन पद्धत पहावयास मिळते, थेट पुढाऱ्यांच्या पाया पडतात. अरे कशासाठी त्याच्या पाया पडता. आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत. त्याच्या ऐवजी तुम्ही आई-वडिलांच्या अनेक गुरूंच्या पाया पडा असा सल्ला देखील त्यांनी या प्रसंगी दिला. जिल्ह्यात येताच अनेकांनी निधीची मागणी केली. मात्र या निमित्ताने एक गोष्ट सांगतो असे म्हणून त्यांनी महायुतीचा जे सूत्र ठरला आहे. त्या पद्धतीने निधी वाटप केला जाईल अशी स्पष्ट भूमिका मांडली. या बरोबरच कुठल्या कामासाठी निधी मागतात याची शहानिशा केल्यानंतरच त्याला मान्यता देणार असे त्यांनी सांगितले.**

अजित पवार म्हणाले, मी स्वप्न दाखवत नाही तर प्रत्यक्षात काम करत असतो. माझं काम म्हणजे 80 टक्के समाजकारण तर 20 टक्के राजकारण असं आहे बीड जिल्ह्यात मात्र उलटी परिस्थिती आहे 80 टक्के राजकारण केलं जातं 20 टक्के समाजकारण हे बदलायला पाहिजे.झालं गेलं ते सगळं विसरून जा असेही ते म्हणाले, चांगल्या कामाने स्वतःचा आणि जिल्ह्याचा विकास करून घ्या हीच संधी आहे असे अजित पवार म्हणाले.

राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी, प्रवक्त्यांनी तोलून मापून बोललं पाहिजे असंही अजित पवार यांनी म्हंटल आहे. पुढे ते म्हणाले, "एक लक्षात ठेवा जिथे जिथे शेतकऱ्यांना मदत लागेल तिथे आम्ही महायुतीचं सरकार म्हणून तुमच्या पाठिशी आहोत. पण तुम्हालाही सांगणं आहे की तरुणांनो या कानाचं ऐकून त्या कानी सांगत बसू नका. तरुणांनी आपली संघटना मजबूत करण्यासाठी काम केलं पाहिजे. बीडची रेल्वे उशीर होण्यास कुणीतरी नैतिक जबाबदारी घेणे गरजेचे आहे. कुणीतरी येऊन जादूची कांडी फिरवून काम होईल असं नसतं असाही टोला उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्यातील नेत्यांना लगावला. पुढील काही दिवसात बीडमध्ये सुधारणा करण्यासाठी अगदी मुक्कामाचा वेळ काढेन, असेही त्यांनी जाहीर केले.

## कामाचा दर्जा तपासा

■ बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध कामाच्या अनुषंगाने माझ्याकडे अशा काही तक्रारी आल्या आहेत. त्याच्या कामाचा दर्जा तपासा असे त्यात म्हटले असून या तक्रारीची मी दखल घेतली आहे. त्या सर्व ठिकाणी मी पथक पाठवून तपासणी करणार आहे. यात जर कोणी दोषी आढळला तर त्याला सोडणार नाही मग तो अजित पवारांचा जवळचा कंत्राटदार असेल तरीही चुकीचे काम करत असेल तर त्याला काळ्या यादीत टाकणार असे त्यांनी यावेळी ठणकावले.

## सगळ्या गँग सुतासारख्या सरळ करणार

■ बीडमध्ये सगळ्या गँग आहेत, राखेची गँग, वाळूची गँग या सगळ्या गँग आहेत. इथे या सगळ्या गँग सुतासारख्या सरळ करणार असल्याचं अजित पवार म्हणाले. "बीड ही देवदेवतांची भूमी आहे. जनतेची सेवा करण्यासाठीचे बळ देण्याचे देवदेवतांना साकडे आहे. बीडकरांची बदनामी करणाऱ्या गोष्टी आपल्याला थांबवायच्या आहेत", असं आवाहन अजित पवार यांनी यावेळी बोलताना केलं.

## धनंजय मुंडे अनुपस्थित

■ बीडचे प्रशासन सुधारण्यासाठी अजित पवार कसे प्रयत्न करतात, याची उत्सुकता सर्वत्र असल्याने दुसऱ्या बैठकीपूर्वी अजित पवार यांनी राख व अवैध वाळू उपसा करणाऱ्यांना इशारा दिला. या बैठकीस प्रकृती बिघडल्याने हजर राहाता येणार नाही असे आमदार धनंजय मुंडे यांनी समाजमाध्यमातून कळवले होते.

## महापुरुषांच्या पाया पडा

■ आजचे पुढारी पाया पडायच्या लायकीचे नाही. ज्यांच्या पाया पडता त्याची हिस्ट्री आठवा. म्हणाल मी कुणाच्या पाया पडलो, कुणाच्या पाया पडलो. आईबापाच्या पाया पडा, गुरूच्या पाया पडा. पूर्वी यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक ही आभाळा एवढी माणसं होती. त्यांच्या पुढे नतमस्तक होऊ ना. छत्रपती शिवाजी महाराज आहे. संभाजी महाराज आहे. राजमाता जिजाऊ, बाबासाहेब आंबेडकर आहे, महात्मा फुले आहेत. मौलाना आझाद आहे, अण्णा भाऊ साठे आहेत. युगपुरुष होऊन गेले. किती जणांची नावे घेऊ. महापुरुषांच्या पाया पडा. पण उगाचच कोणत्याही नेत्याच्या पाया पडू नका

### बीडमध्ये पाऊल ठेवताच अजित पवार संतापले
### सगळ्या गँग इथेच आहेत, त्यांना सुतासारखे सरळ करणार : अजित पवार
### दादागिरी करणाऱ्यांवर मकोका लावण्याचे स्पष्ट निर्देश दिले

## असं चालणार नाही - अजित पवार

■ अजित पवार म्हणाले, 'आज दुपारी बैठक आहे. मी सुरुवात केल्यावर याची माहिती नाही त्याची माहिती नाही, असं चालणार नाही. तुम्हाला चार तास मिळतायेत. या चार तासात सर्व माहिती मला अपडेट द्या.'असे अजित पवार म्हणाले.

## चार तास देतो सर्व माहिती माझ्यासमोर आणा

■ मी येताना चर्चा केली. मी सेक्रेटरीकडे मुद्दे दिले आहेत. विमानतळ, रेल्वेची लाईन असे बरेच मुद्दे आम्ही काढले आहेत. हॉस्पिटल, संकुल, जिल्हा बँकेला काही कोटी रुपये पाहिजेत हे मुद्दे आहेत. चार तास देतो सर्व माहिती माझ्यासमोर आणा.', असे देखील अजित पवारांनी खडसावले.

# जिजाऊंच्या वास्तवाने पावन झालेल्या भूमीमध्ये परळीच्या पत्रकाराचा सन्मान

### ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना वास्तववादी लिखाणासाठी पुरस्कार प्रदान



परळी/प्रतिनिधी

सिंदखेड राजा हे परगणा लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यासाठी प्रसिद्ध आहे. हा राजवाडा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात जिजाबाईंचे वडील लखुजी जाधव यांनी बांधला होता . जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी याच ठिकाणी झाला.

ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात परळी येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या वास्तववादी व सामाजिक लिखाणा बद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला,

राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर प्रांत तथा जिल्ह्यातून आवर्जून उपस्थित झालेल्या साहित्यिक, कवी,आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.

या साहित्य संमेलनात आपल्या वैविध्यपूर्ण लेखनाने वास्तववादी विषय मांडून सामाजिक जागृती करणारे परळी येथील जेष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या लिखाणाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून विविध साहित्यिक, लेखक, पत्रकार यांनी त्यांना फोन करून तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या आहेत.

# परळी औ.वि.केंद्रातुन अधिकृतपणे राख उपसा सुरु

### १८ परवानाधारकांनी पोलिस बंदोबस्तात राखेचे हायवा तळ्याबाहेर काढले ; यापूर्वी बिना नोंदणीचा राख उपसा केला जात होता

परळी प्रतिनिधी

राज्यभर गाजत असलेल्या परळीच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रातुन बाहेर पडणार्या राख वाहतुकीवर दि.२ एप्रिल रोजी पडदा पडला. महानिर्मिती कंपनीने २०२२-२३ चे टेंडर मान्य करत पात्र ई - लिलावाद्वारे निवडलेल्या १८ पात्र बोली धारकांना राखीची उचल करण्यास अधिकृत रक्कम भरून परवानगी देण्यात आली आहे.

सदरील एजन्सी मार्फत पोलिस बंदोबस्तात राखेने भरलेले हायवा आज बाहेर काढण्यास सुरुवात झाली आहे. परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रातुन बाहेर पडणाऱ्या राखेला विटभट्यांसाठी मोठी मागणी असल्याने राखेच्या व्यवसायात जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली होती. संतोष देशमुख खुन प्रकरणानंतर परळीच्या राखेचा प्रश्न व त्यातील अर्थकारण चव्हाट्यावर आल्यानंतर महानिर्मिती कंपनीने तळ्यातील राख उपशावर बंदी घातली होती. राखेचा आम्हालाच उपसा करु द्या या मागणीसाठी दाऊतपूर ग्रामस्थांनी उपोषणही केले होते. या पार्श्वभूमीवर बुधवार दि.३ एप्रिल रोजी महानिर्मिती कंपनीने राख उपसा करण्याची परवानगी दिल्यानंतर पोलिस बंदोबस्तात राख उपसा सुरु झाला आहे. ८०% राख तळे ई - लिलावाद्वारे निवडलेल्या १८पात्र बोली धारकांना राखीची उचल करण्यास अधिकृत रक्कम भरून परवानगी देण्यात आली आहे. औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, उपमुख्य अभियंता महेश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली 'अॅश यूटीलायझेशन सेलची' टीम प्रभारी कार्यकारी अभियंता नंदकुमार आंधळे, सहाय्यक अभियंता अरुण गित्ते, गणेश मुंडे तसेच सुरक्षा विभाग वरिष्ठ व्यवस्थापक बी.आर. अंबाड , सुरवसे, बी के कुलकर्णी आणि स्थानिक पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्तात राख उचलण्यास सुरुवात झाली आहे.. सदरील प्रक्रियेमुळे महानिर्मितीला प्रचंड प्रमाणामध्ये महसूल जमा होणार आहे.





## १८ एजन्सींना राख उचलण्याची परवानगी

■ औ.वि.केंद्राच्या राखेच्या तळ्यातील राख ३५३ प्रतिटन या प्रमाणे आर्यन प्लाय अॅश ब्रिक्स,विभु सप्लायर,शिवम कन्स्ट्रक्शन,तिरुपती हायटेक इन्फ्रा,तुषार फॅब्रिकेटर्स अॅण्ड कन्स्ट्रक्शन,साईनाथ विट उद्योग समुह,सिध्देश्वर कन्स्ट्रक्शन,समाधान ब्रिक्स फॅक्ट्री,सिध्दी कन्स्ट्रक्शन,प्रविण ब्रिक्स फॅक्ट्री,आस्था इन्फ्रास्टक्चर,मारोती सोडगिर,एस.के.लॉजेस्टीक,महादेव गडदे,एस सेल्स अॅण्ड सर्विसेस,ऐस्कॉन एनर्जी सोल्युशन,श्रेयस इन्टरप्रायजेस या पात्रताधारक एजन्सींना राख उचलण्याची परवानगी मिळाली आहे.

# डॉ. श्रीकर परदेशी एक पारदर्शक सनदी अधिकारी

**महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री मा.श्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यालयामध्ये त्यांचे सचिव म्हणून जबाबदारी सांभाळणारे डॉ.श्रीकर परदेशी हे संपूर्ण सनदी अधिकाऱ्यांमध्ये एक पारदर्शक सनदी अधिकारी म्हणून परिचित आहेत. मुंबईच्या मंत्रालयातील मुख्यमंत्री कार्यालयातच आपण मुख्य सचिव श्री विकास खारगे प्रधान सचिव डॉ. अश्विनी भिडे यांच्या सोबतीला मुख्यमंत्र्यांनी ते उपमुख्यमंत्री असतानाच दिल्लीच्या पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या पी एम ओ कार्यालयात कार्यरत असणारे डॉ. श्रीकर परदेशी यांना मुंबईला मंत्रालयात आपल्या कार्यालयात सचिव म्हणून बोलावून घेतले.**




डॉ. श्रीकर परदेशी यांचा माझा पहिला परिचय ते जेव्हा केंद्रीय लोकसेवा आयोगाची आयएएस ही परीक्षा पास झाले तेव्हा झाला. आम्ही 2000 या वर्षापासून दरवर्षी आय ए एस झालेल्या अधिकाऱ्यांचा अमरावतीला भव्य सत्कार घेतो. त्या सत्कारासाठी मी निमंत्रण देण्यासाठी डॉ.श्रीकर परदेशी यांच्याकडे पुणे येथे गेलो होतो. सोबत माझे सहकारी प्राध्यापक मुकेश सरदार हे होते. डॉ.श्रीकर परदेशी यांचा आम्ही फोन नंबर मिळवला. पत्ता मिळवला. मला आठवते तो पुण्याच्या गुलटेकडीचा भाग असावा. त्यांच्या घराच्या दिशेने आमची वाटचाल सुरू झाली .

श्रीकर परदेशी ज्या भागात राहत होते तो भाग सुखवस्तू निश्चितच नव्हता. मध्यमवर्गीय भाग होता. आम्ही परदेशी सरांकडे जेव्हा पोहचलो तेव्हा श्रीमती विद्युत वरखेडकर (ज्या आता अपर जिल्हाधिकारी आहेत) त्या आधीच पोचल्या होत्या. एका खुर्चीवर श्रीकरसर दुसऱ्या खुर्चीवर त्यांच्या मातोश्री तिसऱ्या खुर्चीवर विद्युत मॅडम बसल्या होत्या. फक्त एकच खुर्ची खाली होती. आणि आम्ही येणारे दोघेजण होतो. श्रीकरसरांच्या मातोश्रींनी लगेच खुर्ची खाली करून दिली आणि त्या चक्क जमिनीवर बसल्या. मी त्यांना खूप विनंती केली. पण त्या म्हणाल्या की तुम्ही माझ्या मुलाचे अभिनंदन करायला अमरावतीवरून इतक्या दुरून आले आहेत तुम्ही खुर्चीवरच बसा.

मी श्रीकरसरांचे अभिनंदन केले आणि त्यांना अमरावतीचे निमंत्रण दिले. यावेळी जमणार नाही पण भविष्यात मी नक्कीच तुमच्या अकादमीला भेट देईल असे त्यांनी कबूल केले. कारणही तसेच होते सरांना कागदपत्राच्या पडताळणीसाठी दिल्लीला जायचे होते. आणि त्यांच्याकडे नुकताच बाळाचा जन्म झाला होता. पुढे शब्दांनी आपला शब्द पाळला आणि ते आठवणीने अमरावतीला आले आणि आमच्या मुलांना त्यांनी मार्गदर्शन केले. बोले तैसा चाले ...त्याची वंदावी पाऊले.

श्रीकरसरांबाबत खूप काही सांगण्यासारखे आहे. ते यवतमाळला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेला कार्यरत होते. जिल्हा परिषदेमध्ये जागा निघाल्या. उमेदवार इकडे तिकडे भटकू लागले. याच्या त्याच्या ओळखीने आपले जमते का असे प्रत्येक जण अंदाज घेत होता .पण श्रीकरसरांनी कोणाची डाळ शिजू दिली नाही. त्यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रातील जागेवर मोठा मंडप टाकला. सगळे परीक्षार्थी तिथं बसवले. तिथेच पेपर काढण्यात आला. तिथेच मुलांना देण्यात आला. तिथेच तपासण्यात आला आणि तिथेच निकाल लावण्यात आला. साहेबांनी सगळ्यांचे मोबाईल बंद करण्यास सांगितले होते. सायंकाळी ज्या मुलांचे सिलेक्शन झाले त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. मला जे कळले त्यावरून मी अमरावती वरून यवतमाळला त्यांच्या भेटीला गेलो. सरळ साहेबांच्या जिल्हा परिषद निवासस्थानी पोहोचलो. परदेशी साहेबांचे अभिनंदन केले. साहेब म्हणाले काठोळे सर ज्या मुलांचे सिलेक्शन झाले नाही त्यांनी देखील माझे अभिनंदन केले इतके पारदर्शक काम केल्याबद्दल. एका मुलाचे आलेले पत्र देखील त्यांनी मला दाखवले. निघताना साहेब आम्हाला फाटकापर्यंत सोडायला आले. एक आयएएस ऑफिसर इतका विनम्र पारदर्शक असू शकतो त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे डॉ. श्रीकर परदेशी. महाराष्ट्रात खूप परीक्षा झाल्या पण यवतमाळला जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी असताना श्रीकर परदेशी यांनी ही जी पारदर्शी दर्शवली तशी महाराष्ट्राच्या इतिहासातील एकमेव म्हणावी लागेल.

साहेब अकोल्याला जिल्हाधिकारी होते. तेव्हा महाराष्ट्रात अकोला जिल्हा प्रत्येक बाबतीत प्रथम क्रमांकावर होता. जिल्हाधिकारी असलेल्या डॉ श्रीकर परदेशींच्या कामाचे कौतुक होत होते .तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री अशोकराव चव्हाण हे होते. त्यांनी नांदेडला इतका चांगला जिल्हाधिकारी असावा व नांदेड जिल्ह्याचा विकास जलद गतीने व्हावा यासाठी त्यांनी श्रीकर परदेशीची आपल्या नांदेडला बदली केली नांदेडला चांगले उपक्रम राबवण्यासाठी. साहेबांची नांदेडला झालेली बदली रद्द व्हावी यासाठी अकोल्याला नागरिकांचा मोर्चा निघाला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठा मंडप टाकण्यात आला. साहेबांची बदली रद्द होण्यासाठी आंदोलन सुरू झाले. एका जिल्हाधिकाऱ्याची झालेली बदली रद्द करण्यासाठी मोर्चा निघाल्याची आणि धरणे आंदोलन सुरू झाल्याची महाराष्ट्राच्या इतिहासातील ही एकमेव घटना आहे

श्रीकर परदेशींनी नांदेडला जिल्हाधिकारी असताना एक चांगला पायंडा सुरु केला आणि त्याचे अनुकरण संपूर्ण महाराष्ट्राने केले पहिला. तो म्हणजे त्यांनी दर महिन्याच्या पाच तारखेला स्पर्धा परीक्षा कार्यशाळा सुरू केली. महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या भरपूर आहे. त्या काळात विद्यार्थ्यांना पुरेशी व नेमके मार्गदर्शन मिळत नव्हते. त्यासाठी त्यांनी नांदेडचे शंकरराव चव्हाण सभागृह निवडले. आणि दर महिन्याला पाच तारखेला दोन तासांची स्पर्धा परीक्षा कार्यशाळा सुरू झाली. मलाही एकदा त्यांनी त्या कार्यक्रमात बोलावले. कार्यक्रमाला इतकी गर्दी असायची की मुलांना स्टेजवर बसवावे लागत होते. तो त्यांचा उपक्रम इतका गाजला की महाराष्ट्रातील बहुतांश जिल्हाधिकाऱ्यांनी तो उचलून धरला. अकोला चंद्रपूर अमरावती सारख्या शहरांमध्ये दर महिन्याला एक कार्यशाळा होत गेली. नांदेडला श्रीकर परदेशी यांनी ग्रंथालय आणि अभ्यासिका स्थापन करून स्पर्धा परीक्षेच्या मुलांना एक दालन मोकळे करून दिले. त्यासाठी त्यांनी शासनाच्या निधीच्या सदुपयोग करून चांगले ग्रंथालय व चांगले अभ्यासिका तयार केली ती आजही कायम आहे .

महाराष्ट्रात कॉपीमुक्त अभियान सुरू केले ते श्रीकर परदेशींनीच. आज महाराष्ट्र बऱ्याच अंशी कॉपीमुक्त झाला आहे. पण हे अभियान सुरू करण्यापूर्वी सगळीकडे सावळागोंधळ होता. काही काही सेंटर तर कॉफीसाठी सुप्रसिद्ध होते. शाळेसमोर मंडप टाकून परीक्षा घ्यायला जायच्या इतकी काही सुप्रसिद्ध सेंटरवर गर्दी असायची . तिथे सर्रास कॉपी चालायची. श्रीकर परदेशी सरांच्या हे लक्षात आले आणि त्यांनी लगेच कॉफीमुक्त अभियान नांदेड जिल्ह्यात सुरू केले. चांगले नियोजन केले. त्यांची आखणी इतके सुंदर होती की ज्या शाळेचे निकाल शंभर टक्के लागायचे ते 20 टक्केही लागले नाहीत. साहेबांनी पुढाकार घेऊन दूध ते दूध पाणी ते पाणी हे सिद्ध करून दाखवले. महाराष्ट्र शासनाला देखील हा उपक्रम आवडला आणि शासनाने प्रत्येक जिल्ह्यात हे अभियान राबवण्याचे ठरवले .आज देखील या कॉफी मुक्त अभियानाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने सन्मान होत आहे. पण या कामी परदेशीं साहेबांनी जो पुढाकार घेतला तो महत्त्वाचा आहे.

साहेबांनी वेळोवेळी जे काम केले त्या वेळी महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केला. अनेक सामाजिक संस्थांनी त्यांचा सन्मान केला. त्यांच्या कार्याची महती दिल्लीला पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयात पोहोचली. पंतप्रधानांनी त्यांना दिलेल्या बोलावून घेतले. त्यांच्या पारदर्शक कर्तव्यदक्ष कर्तव्यनिष्ठ कामाची दखल घेण्यात आली. महाराष्ट्रामध्ये सत्ता बदल झाला. उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीकर परदेशी सरांना दिल्लीवरून आपल्या कार्यालयात सचिव म्हणून आणले. त्यांनी श्रीकर परदेशी यांच्या कामाचा अनुभव घेतला होता असा कर्तव्यदष्य दक्ष व पारदर्शक अधिकारी आपल्या कार्यालयात असला तर कार्यालयाला गतिमानता येईल या विश्वासाने त्यांनी परदेशी साहेबांना दिल्लीवरून मुंबईला मंत्रालयात आणले. पुढे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर देखील साहेबांनी आपल्या सचिव पदी त्यांचे नियुक्ती कायम ठेवली.

डॉक्टर श्रीखर परदेशी यांनी समाजासमोर स्वतःचा जो पारदर्शक चेहरा ठेवला आहे तो निश्चितच महत्त्वाच्या आहे. सर्वसामान्य कुटुंबातील हा माणूस आज प्रशासनामध्ये स्वतःच्या पारदर्शकपणामुळे तसेच कर्तव्यनिष्ठतेमुळे लोकप्रिय तर आहेत पण जनमानसामध्येही या माणसाने स्वतःच्या अभूतपूर्व कर्तृत्वामुळे मानाचे स्थान मिळवले आहे.



लेखक
प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे
संचालक : मिशन आयएएस अमरावती कॅम्प



आष्टी- आष्टी येथील नवीन तहसील कार्यालयासमोर बंधुप्रेम इलेक्ट्रिशन & बॅटरी व कार सजावट या नवीन दुकानाचा शुभारंभ गुढीपाडव्याच्या दिवशी ह. भ. प. परमेश्वर महाराज शास्त्री यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास धस, आष्टी तालुका दुध संघाचे माजी चेअरमन आदिनाथ सानप, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, एन.टी गर्जे, पत्रकार संतोष सानप, माजी सरपंच डॉ. संदीप सानप, पांगुळगव्हाण यांचे सरपंच तुकाराम गीते, माजी नायब तहसीलदार गीते साहेब, दुकानाचे संचालक दादा सानप, बाबुराव सानप आदींसह मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेचा मजबूत वार्षिक ताळेबंद: 123 कोटी 95 लाख अर्थिक उलाढाल तर 78 लाख 66 हजार निव्वळ नफा

## ग्राहक व ठेवीदारांच्या विश्वासावर वाटचाल : बाजीराव भैय्या धर्माधिकारी

**परळी वैजनाथ /प्रतिनिधी**

शहरातील बँकींग क्षेत्रात ग्राहक सेवेत तत्पर व बँकीग व्यवहारात विश्वासार्ह पतसंस्था म्हणुन असलेली ओळख कायम ठेवत पतसंस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे.स्वा. वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक वाटचाल मजबूत व प्रगतीपथावर आहे. सरत्या अर्थिक वर्षात संस्थेने 123 कोटी 95 लाख अर्थिक उलाढाल तर 78 लाख 66 हजार निव्वळ नफा कमावला आहे.ग्राहक व ठेवीदारांच्या विश्वासावरच ही वाटचाल सुरु असल्याचे चेअरमन बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले.



स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेची 31 मार्च २2025अखेरचा ताळेबंद सादर करण्यात आला आहे. संस्थेची अर्थिकस्थिती पाहता संस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. विषेश म्हणजे अल्पावधीतच पतसंस्थेतील ठेवी-ठेवी 41 कोटी 05 लाख , राखीव निधी - 7 कोटी 47लाख,भागभांडवल-67 लाख 42 हजार , खेळते भांडवल-50 कोटी 15 लाख, कर्ज- 36 कोटी 06 लाख ,गुंतवणूक 12 कोटी 51 लाख, निव्वळ नफा 78 लाख 66 हजार इतका आहे.तर संस्थेची अर्थिक उलाढाल-123 कोटी 95 लाख आहे.सीडी रेशो 68.62% इतका आहे.

पतसंस्थेच्या या प्रगतीशील वाटचालीत सर्व खातेदार, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा विश्वास हेच पाठबळ आहे असे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. पतसंस्थेचे उपाध्यक्ष अनिल आष्टेकर,सचिव जितेंद्र नव्हाडे , कोषाध्यक्ष रवि वळसे, संचालक श्रीकांत मांडे,राजाभाऊ मराठे, रवि मुळे, दशरथ होळकर, डॉ.सौ.श्रध्दा देशपांडे, सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांच्यासह संस्थेचे व्यवस्थापक किरण सावजी यांच्यासह सर्व कर्मचारी वृंद, नित्यसंचय ठेव प्रतिनीधी यांच्या मेहनतीत व सर्व सभासद ,ठेवीदार, कर्जदार, खातेदार व हितचिंतकांच्या पाठबळावर संस्थेची ही वाटचाल सुरु आहे.






# प्रतिभेला शिक्षणाच्या कुबड्यांची आवश्यकता नसते : संमेलनाध्यक्ष प्राचार्य एन . बी. चापे

**सिंदखेडराजा**
**(बहुजन साहित्य संमेलन विशेष वृत्त)**

मराठीच नव्हे तर कुठल्याही भाषेतील साहित्य व साहित्यिकांची ऐतिहासिक परंपरा जर पाहीली तसेच अनेक संस्थांमार्फत बहुजन साहित्य संमेलनासारखी छोटी - मोठी मराठी साहित्य संमेलने वर्षभर वेगवेगळ्या ठिकाणी पार पडत असल्याचे आताशा आपण नेहमीच पाहत असताना अशा संमेलनातील साहित्यिकांना ऐकून इतर विविध व्यवसाय करणारे अनेक लोक साहित्यिक झाले आहेत हेही आपण सर्व जाणून आहोत. त्या सर्वांचे अवलोकन करताना एवढे निश्चित म्हणता येईल की प्रतिभेला शिक्षणाच्या कुबड्यांची आवश्यकता नसते ! असे प्रतिपादन दि. ३१ - ०३ - २०२५ रोजी महाराष्ट्रंच नाही तर महाराष्ट्राबाहेरही विविध राज्यात ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, मातोश्री मंगल कार्यालय येथे धूमधडाक्यात संपन्न झालेल्या बहुजन साहित्य संमेलनामधे संमेलनाध्यक्ष प्राचार्य एन्. बी .चापे यांनी आपल्या भाषणातून केले.

सहावे बहुजन साहित्य संमेलन सिंदखेडराजा तेथे ३१ मार्च ला मोठ्या उत्साहात पार पडले, त्यावेळी ते अध्यक्ष पदावरुन बोलत होते. तत्पुर्वी सकाळी ९ वाजता राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर त्यांच्या पुतळ्याला विविध प्रांत तथा जिल्ह्यातून आवर्जून उपस्थित झालेल्या साहित्यिक कवी आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवर मंडळींनी पुष्प हार अर्पण करून तथा छत्रपती शिवबांना मुजरा करणाऱ्या गीताच्या गजरात, महाराष्ट्र राज्याच्या संस्थापने दरम्यानच्या काळात पुरोगामीत्व तथा प्रगतीशीलतेचा व राष्ट्रीयतेचा नवाच वारसा निर्माण करणारे तत्कालीन फुले - आंबेडकरी विचारांचे, देशातील पहिले आदर्श गाव म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मौजे सावरगाव डुकरे, ता. चिखली, जि. बुलढाणा येथील पुरोगामी विचारांचा वारसा बोधप्रद भजनी मंडळाच्या द्वारे जपणाऱ्या शाहीर विजय डुकरे पाटील त्यांच्या बरोबरीने हे प्रबोधन कार्य आपल्या मधूर आवाजामधून पुढे चालविणारी त्यांची अर्धांगिनी सौ. अलका विजय डुकरे पाटील या मां जिजाऊंच्या लेकीने सुशोभित पाटावर संविधान ग्रंथ आपल्या डोक्यावर घेऊन गायन करीत संविधान दिंडीला सुरूवात करण्यात आली.





यावेळी बहुजन साहित्य संघाचे हरहुन्नरी कलावंत अध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या " दिंडी निघाली - दिंडी निघाली sss संविधान ग्रंथाची दिंडी निघाली " या गिताने परीसर दुमदुमुन गेला होता. या दिंडीमध्ये झेप साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष डी. एन्. जाधव आणि विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या तसेच डॉ. कस्तुरे व त्यांच्या वकील व कवयित्री पत्नी रेखाताई हणमंते यांच्या आणि स्कॉटलंड यार्ड स्टुडंट्स ब्रँड ॲम्बेसेडर डॉ. संघर्ष सावळे यांच्या व डॉ. कस्तुरे अशा विविध जोड्यांनी गीताच्या तालावर खेळलेल्या फुगडीने वेगळीच रंगत आणली. राजे लखुजी जाधव साहित्य नगरीत पोहचल्या नंतर डॉ . कस्तुरे यांनी काढलेल्या चित्रप्रदर्शनीचे उदघाटन कवयित्री राजकन्या पायके यांनी केले तर रांगोळी प्रदर्शनीचे उदघाटन विधिज्ञ रेखाताई हणमंते यांच्या हस्ते महिलांच्या उपस्थितीत करण्यात आले.

त्या नंतर राजमाता जिजाऊ , छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फूले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करुन सिंदखेडराजा नगरीचे उपविभागीय अधिकारी तथा महाराष्ट्राच्या तळागाळातील व विकासाच्या वाटा पासून वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच विशेषतः भटक्या पारधी समाजातील आबालवृद्धांना संवैधानिक सर्वांगीण विकासाच्या गंगेत सामील करून घेण्याचा वसा बालपणापासून उचलणारे मा. संजय खडसे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. चापे म्हणाले की, साहित्य हा समाजाचा आरसा असतो व साहित्यिक हा लोकशिक्षक असतो. आपल्या मराठी भाषेतील साहित्य इतर भाषेतही अनुवादित व प्रकाशित झाले आहे. बहुजन साहित्य संमेलनाचे संयोजक विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्यासह सर्व पदाधिकारी यांच्या कार्याचे भाषणातून त्यांनी कौतुक केले. सुरवातीला बहुजन साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. बबनराव महामुने यांनी संमेलनाची भूमिका विषद केली. मावळते संमेलनाध्यक्ष व सुप्रसिद्ध समीक्षक मा. किरण डोंगरदिवे, झेप संपादक डी. एन्. जाधव, उपविभागीय अधिकारी मां. संजय खडसे यांची समयोचित भाषणे झाली. उदघाटन सत्रात, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वयोवृध्द भीम शाहीर आयुष्मान पांडूरंग अवसरमोल तथा या चळवळीत त्यांना चिरंतन साथ देणारी त्यांची पत्नी सौ. जनाबाई अवसरमोल, मा. शिवा माळोदे, मा. सुशीलकुमार खरात, त्यांचे बालपणापासूनच प्रबोधनाचा वसा उचलणारे अल्पवयीन चिरंजीव वंश खरात, लहानपणीच फुले- आंबेडकरी विचारांचा आपल्या गायक वादक वडीलांचा वारसा चालविणाऱ्या बाल कलावंत जय दत्तात्रय राऊत, शाहीर विजय डुकरे पाटील व त्यांची पत्नी सौ. अलका विजय डुकरे पाटील, अडाणी असतांनाही लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या गीत गायनाचा व प्रबोधनाचा वसा पुढे चालविणारे तथा डोळ्याने अधू असणारे शाहीर भाऊराव साळवे, चिखली, अगदी अडीच ते तीन वर्षांचाच असताना मराठी व हिंदी चित्रपटात आपल्या आई डॉ. रेणू जोशी प्रमाणेच अभिनय कौशल्य दाखवणारा बाल कलाकार अभिनय श्रीपाद जोशी, साहित्यिक चळवळ चालवणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री मा. कल्पना निंबोकार, सामाजिक कार्यास वाहून घेतलेले मा. हृदयनाथ हिवराळे, छत्रपती संभाजीनगर, बालपणापासून काव्यासक्ती असणाऱ्या तथा अल्पवयातच प्रकाशन संस्था चालवणाऱ्या मा. रविना पवार पाटील, धुळे, सामाजिक तथा साहित्यिक क्षेत्रात सर्वांच्या सुखदुःखाची दखल घेणारे मा. प्राचार्य चापे सर, फुले - आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. शिवाजी वाठोरे, सिल्लोड, पुरोगामी वैचारिक वारसा जपणारे प्राचार्य ज्ञानेश्वर गोरे, देऊळगाव राजा, अंदाजे चाळीस ते पंचेचाळीस वर्षांपूर्वी बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध परीसरात घडलेल्या विकलांग व मनोरुग्ण तरूणीच्या सामूहिक बलात्कार व निर्घृण खून प्रकरणास आपल्या आक्रमक व संघर्षशील महिला सुरक्षा समितीच्या माध्यमातून वाचा फोडून मृत पिडीतेस मरणोत्तर न्याय मिळवून देणाऱ्या डॉ.प्रभाताई चिंचोले, बुलढाणा तसेच त्याच प्रकरणात व त्यांच्या बरोबरीने सातत्याने महिला सुरक्षा समितीच्या चिखली च्या तत्कालीन अध्यक्षा डॉ. कुसुमताई देशमुख, महिला उद्धारक चळवळीतील खंदे व्यक्तिमत्व सौ. आशाताई घाटगे, मागणी, चिखली, खान्देशी व मराठी काव्य गायनातून प्रबोधन करणारे मा. भीमराव सोनवणे, एरंडोल, हॉटेलचा व्यवसाय करीत असतांनाही मुळचा सहृदयी काव्यपिंड जपत पुरोगामी विचारांशी कायमची नाळ असलेले मा. संजय सोनुने, फर्दापूर, छोटीमोठी प्रासंगिक नोकरी करीत मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारातूनही साहित्य संमेलने भरवण्यात प्रथम क्रमांकावर असलेला तरूण मा. योगेश ताटे, औसा, दैनिक पुण्यनगरी द्वारे वास्तविक लिखाण करणारे परळी तालुका प्रतिनिधी धनंजय आरबुने, वकीली व्यवसाय सांभाळीत साहित्यिक संमेलन अखंड चालवणारे मा. ॲड. शंकर कदम, परभणी, वाडवडीलांपासून पारंपारिक चालत आलेली सांस्कृतिक नाळ जोपासत वैचारिक वाटचाल करणारे स्मशानजोगी मा. गणेश रामा शेनुरे, चिखली, मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील व्यवसायी पण मनापासून औदार्य जपत गोरगरीबांच्या सामाजिक, कौटुंबिक कार्यास सदा तत्पर असणारे आणि मातृतीर्थातील या पहिल्या ऐतिहासिक अविस्मरणीय बहुजन साहित्य संमेलन सोहळ्यासाठी आपले सुंदर, सुशोभित व नयनरम्य सृष्टिसौंदर्याने नटलेले मातोश्री मंगल कार्यालय मोफत उपलब्ध करून देणारे मा.शिवप्रसाद उर्फ शिवाभाऊ ठाकरे, घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असतांनाही पारंपारिक तबलापेटी दुरूस्ती सह विविध जातीधर्माच्या गरीब व झोपडपट्टीत राहणाऱ्या एकता नगरच्या सर्वधर्मीय समभाव चळवळीस वाहून घेतलेले मा. विश्वनाथ बावस्कर, चिखली, तीन दशकांपासून साहित्यिक व सामाजिक प्रबोधन करणारे मा. माणिकराव गोडसे, नाशिक , कंडक्टर म्हणून नोकरी करताना अलीकडेच बसचे ब्रेक्स फेल झाल्याचे चालकाने सांगताच गच्च भरलेल्या बसमधील सर्व प्रवाशांना आपल्या जीवाची पर्वा न करता बसच्या मागील भागात नेवून, बसच्या झालेल्या अपघातामधून साऱ्यांचे जीव स्वतः जखमी होऊन सुद्धा वाचविणाऱ्या झुंजार ज्येष्ठ कवयित्री मा. यशोदा पांढरे, जळगाव, सर्वांचे सामाजिक भान व जाण जपणारे सूर्यभान शिंदे, मलकापूर, पोलिस विभागाची कर्तव्यकठोर नोकरी करतांनाही समाजाचे देणे लागतो या भावनेने कार्य करणारे मा. एकनाथराव पाडळे, छत्रपती संभाजीनगर, प्रवचन व भजन कीर्तनातून प्रबोधन करणाऱ्या मा. कवयित्री मा. शीला शिवरकर, कारंजा लाड, सामाजिक व शैक्षणिक कार्यास वाहीलेले मा. राहूल पवार, चिखली इ. मान्यवरांना फुले - शाहू - आंबेडकर या राज्यस्तरीय पुरस्कारांनी मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. तसेच या संमेलनाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणजे संमेलनात उपस्थित साहित्यिक व मान्यवर महिलांना मां जिजाऊंच्या माहेर नगरी मधून येवला नवूवारी पैठणींची सप्रेम भेट देवून संमेलनाच्या विशेष अतिथी सिने अभिनेत्री डॉ. रेणू जोशी, पि. इ. एस्. ( औरंगाबाद ) छत्रपती संभाजीनगर चे माजी प्राचार्य डॉ. हिंमतराव जाधव, ॲड. रेखाताई हणमंते, डॉ. संघर्ष सावळे, प्राचार्य चापे सर, दाभाडे साहेब, डॉ. नंदीनी रिंढे, डॉ. सावली राऊत, प्रा. भास्कर इंगळे, मा. किरण डोंगरदिवे सर, मा. डी. एन्. जाधव, मा. कडूबा बनसोड, डॉ. बबनराव महामुने, डॉ. खरात, प्रा. काटोले इ. मान्यवरांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह, सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ प्रदान करून सर्वांना सन्मानित करण्यात आले. दुपारच्या सत्रात चिखली येथील पंचशील भजनी मंडळाच्या कलावंत, गायक, वादक सदाशिव फुलझाडे, दत्ता राऊत, साहेबराव बोर्डे, सुशीलकुमार खरात व त्यांचे चिरंजीव वंश खरात, विजय डुकरे पाटील व डॉ. कस्तुरे इ. च्या बेटी बचाव, बेटी पढाव संदर्भातील मराठी व इंग्रजी गीत गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आणि निमंत्रित कवींचे कविसंमेलन मां. डॉ . सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. याप्रसंगी मा. सुधीर शेरे सर, डोंबीवली यांच्या ओव्या दिनांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.या संमेलनाच्या संपन्नतेमधे पूर्वनियोजित अध्यक्ष सुप्रसिद्ध गझलकार डॉ. गणेश गायकवाड, बुलढाणा यांचा सिंहाचा वाटा असून मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीचे उदारहृदयी व कार्यकर्तुत्ववान आमदार मां. मनोज कायंदे यांच्या व त्यांच्या सहकार्यशील मित्रमंडळी व कार्यकर्त्यांचे बहुमुल्य सहकार्य लाभल्याने उपस्थित सर्व मान्यवर रसिक प्रेक्षकांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करून आभार मानले. बहुजन साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी ब. सा. सं. चे उपाध्यक्ष डॉ. बबनराव महामुने, सचिव डॉ. डी. व्ही. खरात, तथा प्रा. शालीनी काटोले, ॲड. रेखाताई हणमंते, भाव कवी अंकुश पडघान, दैनिक लोकनेता चे तरूण संपादक ज्ञानेश्वर बुधवत, संजय सोनकांबळे, विशाल जायभाये, वरद जायभाये, ज्येष्ठ कवी व सामाजिक कार्यकर्ते गजानन दराडे, केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली चे विशेष उपाध्यक्ष मा. रविंद्र सोनार, फोटोग्राफर विठ्ठल सपकाळ, कवयित्री ॲड. वर्षा कंकाळ, केंद्रीय मानवाधिकार चे संदीप शिंदे, पवन शर्मा तथा मनोज शर्मा बंधू, ॲड. देवराव वानखेडे, चिखली तथा सर्व मित्रमंडळी व बऱ्याच ऊदारहृदयी नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले. या देखण्या बहुजन साहित्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन संयोजक विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन. डॉ. खरात यांनी केले. यावेळी छत्रपती संभाजीनगर, जळगांव, पुणे , लातूर, अमरावती, नागपूर, धुळे, नाशिक, नगर, ठाणे, मुंबई या सह अनेक जिल्ह्यातील साहित्यिक, समीक्षक विचारवंत आणि रसिकांनी मोठ्या संख्येने साहित्य संमेलनात हजेरी लावली हे विशेष ! त्यामुळे हे संमेलन खऱ्या अर्थाने " बहुजन" साहित्य संमेलन ठरले असे म्हणावे लागेल.

# जालन्यातील गावागावात ना. पंकजाताई मुंडे यांचे जंगी स्वागत

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या आश्रमशाळेच्या वस्तीगृह इमारतीचे ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते थाटात भूमिपूजन

**जालना प्रतिनिधी**

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या आन्वी येथील संत भगवान बाबा आश्रमशाळेच्या वस्तीगृहाच्या इमारतीचे भूमिपूजन राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज मोठया थाटात झाले.

आन्वी (ता. बदनापूर) येथील पंडित दीनदयाळ शिक्षण संस्थेच्या संत भगवान बाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेच्या नवीन वस्तीगृहाच्या इमारतीचे भूमिपूजन आज राज्यपाल बागडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी नियोजित कार्यक्रमाकडे जात असताना रस्त्यात अकोला (निकळक), आन्वी तसेच गावोगावी ग्रामस्थांनी रस्त्यात वाहनाचा ताफा थांबवून जेसीबीतून फुलांचा वर्षाव करत ना. पंकजाताई व राज्यपाल बागडे यांचे वाजतगाजत जोरदार स्वागत केले. यावेळी गावातील छत्रपती शिवाजी महाराज आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संत भगवान बाबा आश्रमशाळेत संस्थेच्या वतीने ना. पंकजाताईंचे स्वागत करण्यात आले.







### जो संस्कार ग्रहण करतो तोच जीवनात यशस्वी होत असतो : ना. पंकजाताई मुंडे

■ शिक्षक हे आपल्या जीवनात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असतात. गुरु कधीही मुलांवर वाईट संस्कार करत नाहीत. योग्य ती दिशा दाखविण्याचे कार्य हे गुरुवर असते. तर दाखविलेल्या योग्य वाटेवर चालण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असते. आणि स्वत:च्या मनावर ताबा ठेवत, जो संस्कार ग्रहण करतो तोच जीवनात यशस्वी होत असतो. तथापि मराठी शाळेतूनच संस्कारक्षम माणसे निपजली जातात, असं जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितलं.

### मैदानी खेळ खेळा, शिक्षण घ्या आणि आपले जीवन यशस्वी करा

■ मराठी शाळेत संस्कारक्षम पिढी घडविण्याची सक्षमता आहे. जिल्हाधिकारी, शासकीय अधिकारी, मंत्री पदापर्यंत झेप घेतलेल्या व्यक्तींचे शिक्षण हे मराठी शाळेमधूनच झाल्याचे आपल्याला दिसून येईल. संघर्षामधूनच इतिहास घडत असतो, त्यामुळे शॉर्टकट वापरुन पुढे जाण्याचा विचारसुध्दा मनात येवू देवू नका. मैदानी खेळ खेळा, शिक्षण घ्या आणि आपले जीवन यशस्वी करा असेही त्यांनी सांगितले. आज गावच्या गावे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घेत आहेत, या माध्यमातून महिलांना आर्थिक बळ देण्याचे काम शासनाने केले आहे असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमास ग्रामस्थ, पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इटान येथील शेतकरी महिलेला शेतीसंदर्भात त्रास देणाऱ्या गाव पुढाऱ्यांशी पोलीस स्टेशन लाखांदूर येथे बैठक!

### बैठकीत प्रश्न मार्गी:शेतकरी महिलेचा उपोषण मागे

**साहिल रामटेके:लाखांदूर**

भंडाऱ्याच्या लाखांदूर तालुक्याच्या ग्राम ईटान येथील सुनिता मेश्राम ह्या नामक गरीब शेतकरी महिलेची अतिक्रमणाची शेती होती.शेतकरी महिलेकडे उपजीविकेच्या कोणत्याही साधन नसल्याने अतिक्रमणाच्या शेतीमध्ये परिसर दंड आकारणी करून शेतीची पेरणी करत होती.मात्र गावातील सरपंच पोलीस पाटील यांच्या पतीकडून वारंवार मानसिक त्रास देण्यात येत असल्याचा व शेतीची मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचा आरोप महिलेने केला होता.महिलेला देण्यात आलेल्या मानसिक त्रासाबद्दल व शेतीतील झालेल्या धानपिकाच्या नुकसानीबद्दल त्यासंदर्भात न्यायाच्या मागणीला घेऊन शेतकरी महिलेकडून एसपी कार्यालयासमोर उपोषणावर बसण्याचा इशारा १ एप्रिलला देण्यात आला होता.दरम्यान ३० मार्चला गैरअर्जदार ह्यांच्याशी पोलीस स्टेशन लाखांदूर येथे बैठक घेऊन ठाणेदार सचिन पवार व पत्रकार बांधव तसेच अर्जदार-गैरअर्जदार यांच्या उपस्थितीत विशेष चर्चा करण्यात आली व प्रश्न निकाली काढून सर्वांना समज देऊन महिलेला शेतीची नुकसान भरपाई देण्यात आली.ह्यापुढे गैरअर्जदार यांच्याकडून महीलेला कुठलाही त्रास होणार नसल्याचेही ठाणेदार यांच्याकडून सांगण्यात आलं.यामुळे महिलेने समाधान व्यक्त करून उपोषण मागे घेतला.



## महिला ग्रामपंचायत अधिकाऱ्याची हुकुमशाही..!

### सचिवाने महिला असल्याचा आव दाखवून ग्रा. पं.पदाधिकाऱ्यांची पोलीस स्टेशनला केली खोटी तक्रार!

**साहिल रामटेके:भंडारा**




लाखांदूर तालुक्याच्या ग्रामपंचायत चिचाळ येथील ग्रामपंचायत अधिकारी ह्या महिला आहेत,आणि ह्याच गोष्टीचा फायदा घेत चिचाळ येथील महिला सचिव हे ग्रामपंचायत पदाधिकारी यांना कुठलीही कल्पना न-देता स्वतःच्या मनमर्जीने ग्रामपंचायतची कामे करत असतात.ग्रामपंचायत संदर्भात पदाधिकाऱ्यांनी कुठल्याही कामाची विचारणा केली असता महिला सचिव हे अरेरावीची भाषा वापरतात,कधी फसवणूक करण्याच्या धमक्या देत असतात. तर ग्रामपंचायतच्या सदस्य,सरपंच,उपसरपंच यांना नजुमानता आपला मनमर्जी कारभार करत असल्याचेही ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे आरोप केलेली आहेत. ग्रामपंचायत कुठलेही कामाबद्दल सचिव यांना विचारणा केली असता नेहमी पोलीस स्टेशनला तक्रार देण्याच्या किंवा फसवणूक करण्याच्या धमक्या देत असल्याचे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आला आहे. एकदा होणारा काम सचिव मॅडम यांच्या सही अभावी रखडलेला असतो.तर बरेचसे असे काम आहेत जे अजूनही अपूर्ण आहेत.

काही दिवसांपूर्वी उपसरपंच ह्यांनी ग्रामस्थ नागरिकांना घरकुलासाठी लागणाऱ्या कामासंदर्भात महिला सचिव यांना विचारणा केली असता उद्धटपणे बोलून काही ग्रामस्थांची व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची दिघोरी पोलीस स्टेशनला तक्रार केली आहे.मात्र दिलेली तक्रार सचिवांनी खोटी दिली असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.सचिव हे स्वतः मनमर्जी कारभार चालवत असून,उलट सचिवांनीच ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांची तक्रार दिल्यामुळे गावातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.अशा मुजोरशाही करणाऱ्या सचिवावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ आणि ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांकडून होत आहे.

## शिरुर, गेवराई तालुक्याला ना. पंकजाताई मुंडे यांनी दिलं विकासाचं गिफ्ट!

**बीड प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शिरूर कासार आणि गेवराई तालुक्याला विकासाचं गिफ्ट दिलं आहे. शिरूर तालुक्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव कोल्हापूरी बंधाऱ्याच्या विस्तारासाठी २२ कोटी तर ब्रह्मनाथ येळंब व टाकळगाव हिंगणी (गेवराइ) येथील बंधाऱ्यासाठी ३७ कोटी रूपये निधीला राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.



राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. ना. पंकजाताई मुंडे यांच्यामुळे या बैठकीत बीड जिल्ह्याला विकासाचं गिफ्ट मिळालं. जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी २२.०८ कोटी रुपये, सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १७.३० कोटी रुपये आणि सिंदफणा नदीवरील टाकळगाव (हिंगणी) (ता. गेवराई, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १९.६६ कोटी रुपये अशा तीन कामांना बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

## सिरसाळ्यात चिल्ला आणी कान्होबाची काठी ही पुर्वी परंपरा "जैसे थे " : तहसीलदार व्यंकटेश मुंडे

**सिरसाळा / अतुल बडे**

सिरसाळ्यात काही दिवसा पुर्वी चिल्ला आणी कान्होबाची काठी या विषयी बीड जिल्ह्यात प्रकरण गाजल होत. म्हणुण मंगळवार रोजी सिरसाळा पोलिस स्टेशन येथे एक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत दोन्ही समाजाच्या लोकांनी मोठ्या संखेने उपस्थिती दर्शविली होती.

दोन्ही समाजांकडून चिल्ला आणी कान्होबाची काठी या विषयी दोन्ही समाजांनकडून परिस्थिती जाणुन घेतली असता चिल्ला आणी कान्होबाची काठी ही पुर्वीपासून परंपरा चालत आलेले आहे. अशी दोन्ही समाजातील लोकांनकडून चर्चे दरम्यान ऐकण्यात आले. यामुळे गावात काही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी मा. तहसीलदार व्यंकटेश मुंडे, सपोनि गोरखनाथ यांनी पुर्वी ज्या प्रकारे परंपरा राबविण्यात आलेले आहे.



## लोकजागर

### लोकसेवार्थ मानसिक रुग्णांचा आधार 'अमृतवाहिनी'

अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ ही महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील बेघर, सोडून दिलेल्या रस्त्याच्या कडेला असलेल्या मानसिक रुग्णांच्या पुनर्वसनासाठी समर्पितपणे काम करणारी एक स्वयंसेवी संस्था आहे. मानवसेवा प्रकल्पात आमच्याकडे ६० रुग्ण आहेत आणि आतापर्यंत सुमारे २५०० रुग्णांना त्यांच्या कुटुंबियांशी यशस्वीरित्या पुनर्मिलन करण्यात आले आहे. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ स्थलांतरित कामगारांमध्ये एसटीआय/एचआयव्ही एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी काम करत आहे.

श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाने अहमदनगर शहरात आणि संपूर्ण जिल्ह्यात मानसिकदृष्ट्या आजारी रस्त्याच्या कडेला असलेल्या बेघर लोकांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे जिथे रुग्णांची संख्या खूप मोठी असल्याचे आढळून आले आहे ते १०८० आहे ज्यामध्ये ३८० महिला आणि ७०० पुरुष आहेत. हे सर्वेक्षण अमृतवाहिनीने २०१० ते २०११ या कालावधीत केले होते. या संख्येमागील कारणे आणि आजार म्हणजे गंभीर गरिबी, वैद्यकीय सुविधांचा अभाव, परिचित समस्या, मानसिक धक्के, मद्यपान आणि अंमली पदार्थांचे व्यसन. संस्थेने प्रामुख्याने या समस्येवर त्यांच्या पातळीवर काम केले आहे आणि काही प्रकरणे सोडवली आहेत. अहमदनगर शहर हे महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागात आहे. या वर्षी येथे अत्यल्प पाऊस पडला आहे. हा जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. लोकांना तीव्र कामगार समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. काही लाभार्थी या जिल्ह्यातील आहेत तर काही त्यांच्या कुटुंबियांनी आणि नातेवाईकांनी भरपूर आहेत. हेच एकमेव कारण आहे की संघटना त्यासाठी अर्ज करण्यास प्रेरित आहे. रुग्ण रस्त्यावर फिरत आहेत आणि मानसिक स्थितीच्या धोक्याच्या परिस्थितीत आहेत. म्हणूनच संघटना त्यांना काही अधिक वैद्यकीय आणि मानसिक माहिती देऊ इच्छिते ज्यामुळे त्यांना स्थिरता आणि शारीरिक विश्रांती मिळण्यास मदत होईल. आजाराची संख्या आणि गांभीर्य लक्षात घेता अहमदनगर शहर आणि जिल्ह्याच्या पातळीवर अशा रुग्णांची ओळख, बचाव, समुपदेशन उपचार आणि पुनर्मिलन आणि काही प्रमाणात पुनर्वसन या पातळीवर हस्तक्षेप करणे काळाची तातडीची गरज आहे. या चारही पातळ्यांवर असे हस्तक्षेप करता येईल जिथे हा प्रकल्प सोडून दिलेल्या आणि विस्थापित रुग्णांना आणि पालकांना मानवी पातळीवर कायमस्वरूपी एकत्र आणण्यासाठी उत्प्रेरक ठरेल. हे मानवी हक्कांच्या कक्षेत देखील आहे.



अहमदनगर जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागात बेघर लोक फिरत असल्याने, संस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीला घेऊन सर्व स्तरांवर त्याची ओळख पटवणे आणि कुटुंबांकडून किंवा विशिष्ट कालावधीत ओळख पटली नसल्यास सरकारकडून परवानगी घेणे आणि नंतर पुढील प्रक्रिया सुरू करणे हा पहिलाच हस्तक्षेप असेल. ओळख पटल्यानंतर आणि काही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थेच्या केंद्रस्थानी त्या व्यक्तीवर उपचार सुरू केले जातील. यासाठी संस्थेने अहमदनगर येथील क्षीरसागर रुग्णालयाशी करार केला आहे, जिथे डॉ. क्षीरसागर मानसोपचारात एमडी आहेत. संस्थेने उपचार आणि मानसोपचारांसाठी डॉ. अनयक्षीरसागर यांच्याशी सामंजस्य करार केला आहे. .ही प्रक्रिया व्यक्तीच्या मानसिक समाधानाच्या विशिष्ट पातळीवर सुरू होईल. ती प्रथम पुनर्मिलनाच्या दिशेने राबवली जाईल आणि जर ती कार्यक्षम नसेल तर त्या व्यक्तीला कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी पाठवले जाईल.

जर एखाद्या व्यक्तीचा उपचाराने विकास झाला आणि जर त्या व्यक्तीचे कुटुंब चांगल्या आणि स्वीकारार्ह परिस्थितीत आढळले तर त्या व्यक्तीला कुटुंबांकडे सोपवले जाईल. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळात प्रशिक्षित झालेल्या अनेक रहिवाशांचे आता पुनर्वसन झाले आहे आणि ते फायदेशीरपणे रोजगार मिळवत आहेत.आता कौशल्य प्रशिक्षणावर अधिक भर दिल्याने, प्लेसमेंट सेवा मजबूत करण्यासाठी आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची व्याप्ती वाढवण्याच्या योजना सुरू आहेत.



### शून्यातून विश्व बांबूची यशश्वी शेती

शेती म्हटलं कि अनिश्चितता असल्याचा व्यवसाय म्हणून पाहिलं जातं. मात्र अलीकडच्या काळात तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर शेतीकडे वळत चालला आहे. अनेक उच्चशिक्षित तरुण आज शेतीकडे वळतांना दिसत आहेत. शेतीत काहीतरी नवीन करायचं म्हणून नाशिकच्या एका आयटीच्या तरुणाने बांबूची शेती उभारून नवा पर्याय उभा केला आहे.

नाशिकमधील अनेक तरुणांनी आता नोकरीच्या मागे न लागता इतर उद्योग, व्यवसाय, पर्यटन आदी क्षेत्रात उभारी घेत आहेत. नाशिक जिल्ह्यातीलच मूळचा त्र्यंबकेश्वर तालुक्यातील तळेगाव येथील असलेला प्रशांत दाते याने बांबू शेतीत उतरून प्रगतशील शेतकरी म्हणून नावारुपाला आलेला आहे. सध्या प्रशांत हा लाखलगाव (रामाचे) येथील प्रगतशील युवा शेतकरी म्हणून ओळखला जातो. मात्र तो देखील द्राक्ष, गहू यासारखी पिके घेत असायचा. मात्र द्राक्ष शेतीत मान्सूनच्या लहरीपणामुळे वारंवार होणाऱ्या नुकसानीपासून दूर राहण्यासाठी शाश्वत शेतीचा नवा पर्याय म्हणून बांबू पिकाची शेती करण्याचा धाडसी निर्णय घेतला. आणि आजघडीला नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रभर त्याची बांबू शेती प्रसिद्ध झाली आहे. आता पुण्यात थेट शंभर एकरवर बांबू लागवड करण्याचा मानस प्रशांतने बोलून दाखविला.

दरम्यान नाशिक शहरात शिक्षण झालेला, 2012 साली नाशिक येथून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या मागे न लागता स्वतः शेतीतून काहीतरी नवीन निर्माण करण्याची जिद्द प्रशांतकडे होती. पूर्वी शेतात असणाऱ्या द्राक्ष शेतीला फाटा देऊन हा युवक बांबू शेतीकडे वळाला. द्राक्षाला बांबूचा लागत असायचा, बांबूला अनेक ठिकाणी वापर होत असायचा म्हणूनच बांबू शेती करण्याचा निर्णय घेतला. मात्र तत्पूर्वी त्याने जिल्ह्यासह इतर भागात जाऊन नेमकी बांबू शेती कशी केली जाते? बांबूचे प्रकार कोणते? कोणत्या हंगामात बांबू शेती केली जाते? हे सर्व प्रश्न त्याच्या मनात घिरट्या घालत होते. यासाठी 2016 मध्ये प्रथम बांबू लागवडीबाबत माहिती घेण्यास सुरवात केली. सुरवातीच्या काळात अमरावती कृषी विद्यापीठ, कृषि विद्यापीठ दापोली या ठिकाणच्या बांबू रोपवाटिकेस भेट देऊन बांबू शेतीबाबत माहिती घेतली. 2017 मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रानबाभळी येथील शेतकऱ्याकडून बांबूच्या माणगा जातीच्या 500 कंद खरेदी करून त्या प्रजातीची लागवड 1 एकर शेतावर केली. जवळपास एक लाख रुपयांचे भांडवल गुंतवून आतापर्यंत सात लाखांचे रोप तयार केल्याचे प्रशांतने सांगितले.

त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र बांबू विकास महामंडळ, बांबूगार्डन वडाळी अमरावती, केरला वन संशोधन संस्था पिची, इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेस्ट प्रॉडक्टव्हिटी झारखंड, फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट डेहराडून, फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट जोरहाट आसाम, नागालँड, बांबू संशोधन संस्था, कृषि विद्यापीठ शिमोगा कर्नाटक, जवाहरलाल नेहरु ट्रॉपिकल बॉटनिकल गार्डन व संशोधन संस्था तिरुअनंतपुरम, केरळ ह्या ठिकाणी जाऊन बांबू शेतीबाबतची माहिती घेऊन बांबूच्या विविध 14 प्रजातीचे संवर्धन केले. याशिवाय रोजगाराच्या दृष्टीने स्वतःच्या शेतावर बांबू ऑक्सिजन पार्क ही संकल्पना राबवून हॉटेल व लॉजिंग व्यवसाय सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यातून अर्थार्जनाला नवी संधी निर्माण होईल. सध्या त्यांनी पुणे जिल्ह्यात 100 एकर शेती भाडेतत्त्वावर करार पद्धतीने घेऊन 100 एकर बांबू शेती उभी करण्याचा प्रयत्न सुरू व भविष्यात इथेनॉलसारखा प्रकल्प राबवण्याचा त्यांचा मानस आहे.

### शब्दार्थ JCB

खरं तर, आपण ज्या मशीनला जेसीबी म्हणता, त्या मशीनचं नाव जेसीबी नाही; जेसीबी हे मशीन तयार करणाऱ्या एका कंपनीचं नाव असून, कंपनीचे मालक व ब्रिटिश अब्जाधीश जोसेफ सिरिल बामफोर्ड यांचं नाव आहे. त्यांच्या नावाचा शॉर्ट फॉर्म जेसीबी, असा होतो.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

LAST PAGE

» • बीड, गुरुवार, दि. 3 एप्रिल 2025

या जागेवर जाहिरात स्विकारली जाईल जाहिरातीसाठी संपर्क करा मो. 8446447777

# नवसाला पावणारी वेलतुरीची वेलजामाता

**देऊळगाव.(आदिनाथ ठोंबरे)**

गर्भागिरी पर्वताच्या पायथ्याशी वसलेले वेलतुरी, हे एक आष्टी तालुक्यातील छोटेसे गाव आहे. या गावाच्या चारही बाजूंनी गर्भागिरी पर्वताच्या सलग्न पर्वतरांग आहेत. या सुंदर निसर्गामध्ये राज राजेश्वरी त्रिपुरी सुंदरी वेलतुरी निवासी आई अंबाबाई श्री वेलजामाता देवीचे मंदिर आहे. ही वेलजामाता वेलतुरी गावाचे ग्रामदैवत आहे. आणि ही वेलजामाता नवसाला पावणारी देवी म्हणून या भागात मध्ये प्रसिद्ध आहे.

या वेलजामातीच्या वर्षातून दोन यात्रा भरतात. एक नवरात्र मध्ये आणि एक गुढीपाडव्याला. याही वर्षी सालाबाद प्रमाणे वेलतुरी गावच्या नवयुवक तरुणांनी पैठण येथून पवित्र नाथसागराचे गंगेचे पाणी आणून देवीचा अभिषेक करण्यात आला. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात मध्ये आई वेलजमातेचा जयघोष करून उत्सव संपन्न झाला. दरवर्षी भाविकांची मोठ्या प्रमाणात वाढणारी गर्दी, व नवसाला पावणारी आई वेलजामाता देवी आपल्या भक्तांना संकटकाळी मदतीला धावून जाऊन भक्तांना तारते. आई वेलजा मातेच्या नावावरूनच या गावाला वेलतुरी हे नाव देण्यात आलं अशी आख्यायिका सांगण्यात येते. अशा या सुंदर निसर्गामध्ये वसलेल्या वेलतुरी गावातील वेलजामातेचे मंदिर हे, भक्तांचे श्रद्धास्थान आहे.



**वेलजामाता ही नवसाला पावणारी देवी आहे. या वेलजामातेच्या नावावरूनच आमच्या गावाला वेल तुरी हे नाव पडले आहे. आमच्या गावामध्ये वर्षातून या देवीच्या दोनदा यात्रा भरतात. आणि यात्रेमध्ये गावातील सर्व धर्मातील लोक गुण्या गोविंदाने यात्रेत सहभागी होतात..**

**– प्राध्यापक प्रशांत गायकवाड सर**

## श्री नागनाथ पालखी मोठ्या उत्साहात संपन्न : ह.भ.प. श्रीराम सोनी

**परळी-वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी तालुक्यातील नागापूर देवस्थान येथे दरवर्षी प्रमाणे बाहीवर्षी परळी तालुक्यातील नागापूर येथे ग्रामदैवत प्रभू श्री नागनाथ देवांची पालखी गुढीपाडव्यानिमित्त रविवारी रात्री १२ वाजता नागनाथ मंदिरातून निघणार असून दुसर्या दिवशी सोमबार रोजी पालखीची मंदिरात आरती करण्यात येते. नागापूर गावात पालखी मिरवूण आल्यानंतर नागनाथ मंदिरात दुपारी १२ वाजता आरती करण्यात आली. या पालखी सोहळ्यात नागापूरसह पंचक्रोशीतून आलेले भारूड म्हणणारे भारूडे हे अतिशय चांगल्या पद्धतीने भारूडे म्हणण्याचा कार्यक्रम नवीन वर्षाच्या प्रारंभी करण्यात आला.



गुढीपाडव्याच्या दिवशी संध्याकाळी आपल्या नागापूर गावचे ग्रामदैवत प्रभू श्री नागनाथ देवांच्या मंदिरातून निघालेली श्री नागनाथ देवांची पारंपारिक पालखी टाळ, मृदंग, भजन, भारुड, फुगडी च्या भक्तिमय वातावरणात पारंपारिक पद्धतीने गावातून मिरवून दुसऱ्या दिवशी दुपारच्या सुमारास श्री नागनाथ मंदिरात आल्यानंतर श्री नागनाथाची पालखी खांद्यावर घेण्याचे प्रथमच भाग्य लाभल्याने मन प्रसन्न झाले. नागापूर गावात आटोचालकांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या पालखी सोहळ्यात ह.भ.प. श्रीरामजी सोनी व देवलकमिटीचे सदस्य कुंडलिकअप्पा सोळंके, मिसाळ मामा, यांच्यासह उपस्थित होते.

## चुकीचे कागदपत्रे देऊन मिळविला वसुली अधिकार,आष्टी येथील पतसंस्थेचा प्रताप ;जिल्हा उपनिबंधक बीड येणार अडचणीत

**आष्टी प्रतिनिधी**

येथील आष्टी नागरी सहकारी पतसंस्थेने चुकीची माहिती देवुन प्राप्त केलेले वसुली अधिकाऱ्याचे 156 चे अधिकर पतसंस्थेच्या वसुली अधिकाऱ्याने आपली व सहकार विभागाची फसवणुक करत मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. 2474 दि. 31.10.2018 मधील सुचना (अ) 4 चे उल्लंघन केलेले आहे. त्याच बरोबर आपला आदेश जा.क्र. 628 दि. 05.02.2024 मधील अटी व शर्त क्र. 13 चे देखील उल्लंघन केलेले आहे.त्यामुळे सदरील पतसंस्थेच्या आडमुठ्या पणामुळे जिल्हा उपनिबंधक बीड अडचणीत येणार असल्याचे

समोर आले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की,आष्टी येथील बेदरे पियुष सतिष व इतर रा. एस.एम. बेदरे सराफ,संभाजी चौक, यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले,माहीती अधिकारातुन मिळालेल्या माहिती नुसार आपण आष्टी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आष्टी यांना जा.क्र. 628 दि.15.02.2024 अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा 1960 चे कलम 156 नियम 1961 चा 107 अन्वये अधिकार दिलेले आहेत.परंतु सदरील पतसंस्थेच्या वसुली अधिकाऱ्याने आपली व सहकार विभागाची फसवणुक करत मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. 2474 दि. 31.10.2018 मधील सुचना (अ) 4 चे उल्लंघन केलेले आहे. त्याच बरोबर आपला आदेश जा.क्र. 628 दि. 05.02.2024 मधील अटी व शर्त क्र.13 चे देखील उल्लंघन केलेले आहे. उपरोक्त अटी व शर्तीनुसार ज्या पदाधिकारी / अधिकारी यांना वसुलीचे अधिकार प्रदान करण्यात येतील त्यांनी 03 वर्षातुन किमान एकदा मान्यता प्राप्त संस्थेकडुन 03 दिवसाचे प्रशिक्षण घेणे आवश्यक असताना आष्टी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आष्टी चे वसुली अधिकारी पोकळे काका कारभारी व शेलार आनंद कारभारी यांनी महाराष्ट्र राज्य सहकरी पतसंस्था फेडरेशन चे दि. 07.10.2023 ते 08.10.2023 या दोनच दिवसाचे प्रशिक्षण घेतले आहे. संबंधीत वसुली अधिकारी यांनी आपली व सहकार विभागाची फसवणुक केलेली आहे. त्यामुळे त्यांना दिलेले 156 चे अधिकार तात्काळ रद्द करुन त्यांच्या सहीने काढलेल्या आदेशांना तात्काळ स्थगीती देण्यात यावी.तसेच त्यांनी आपली व सहकार विभागाची फसवणुक केली म्हणुन त्यांचे विरुध्द भा.न.स. 318 (4) अन्वये कायदेशिर कारवाई करण्यात यावी.

यावर आपन तात्काळ 08 दिवसाच्या निर्णय घेवुन आम्हाला कळवावा. आपण यावर योग्य ती कायदेशिर कारवाई 08 दिवसाच्या आत न केल्यास आपणा विरुध्द व संबंधीत वसुली अधिकाऱ्या विरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे याचीका दाखल केली जाईल. होणाऱ्या परिनामास व खर्चास आपण जबाबदार रहाल याची गांभीर्याने दखल घ्यावी.असेही दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

## आम आदमी पक्षाकडून सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी उपोषणास्त्र वापरण्याचा इशारा

**महागाव प्रतिनिधी**

मागील चार महिन्यापासून प्रभाग क्रमांक 11 व 16 मध्ये एकत्रित पाणीपुरवठा असून घरपोच पाणी पोहोचण्यासाठी प्रभाग क्रमांक ११ मध्ये नवीन बोअर मारण्याची आम आदमी पक्षाची मागणी प्रभाग क्रमांक अकरा व सोळा मधील नागरिकांना एक बोअर असून त्याला पाणी अत्यल्प प्रमाणात आहे व त्यावर एक एचपीची मोटार असून दररोज पाणी घेण्यासाठी येणाऱ्या लोकांना नाहक त्रास होत आहे व अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे अर्धा प्रभाग पाण्यापासून वंचित राहत आहे व लोकांमध्ये या एकत्रित पाणीपुरवठ्यामुळे भांडण तंटे वाद निर्माण होत आहेत व यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे व प्रभाग क्रमांक 11 मध्ये दुसरा बोअर मारणे अति आवश्यक असल्याकारणाने आम आदमी पक्षातर्फे तहसील कार्यालय महागांव व नगरपंचायत कार्यालय महागांव येथे निवेदनाद्वारे ही माहिती कळवण्यात आली व येत्या 16 एप्रिल पर्यंत सुरळीत पाणीपुरवठा न झाल्यास 17 एप्रिल पासून प्रभाग क्रमांक 11 व 16 मधील सर्व




नागरिकांसोबत धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला व यावेळी प्रभाग क्रमांक पाच चे शिवसेना नगरसेवक रामराव पाटील नरवाडे सामाजिक कार्यकर्ते बाळू पाटील नरवाडे नगरपंचायत कर्मचारी कैलास पाटे आम आदमी पक्ष तालुका कार्यकारणी मध्ये तालुका उपाध्यक्ष आप विवेक राजेंद्र नरवाडे शहराध्यक्ष दीपक तायवाडे शहर उपाध्यक्ष सिद्धांत डोंगरे शहर उपाध्यक्ष आकाश कावळे शहर उपाध्यक्ष अभिजीत बहादुरे शहर उपाध्यक्ष अमय पाटे अनुसूचित जाती जमाती अध्यक्ष स्वप्निल कावळे क्रीडा अध्यक्ष रतिश सांगडे युवा आघाडी अध्यक्ष रुद्र दळवे साहेबराव कांबळे युवा फोर्स उपाध्यक्ष शाम तायवाडे सामाजिक कार्यकर्ते चंदू भाऊ सामाजिक कार्यकर्ते रियाज शेख व इत्यादी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते

## वाहिरा गावच्या उपसरपंच पदी पल्लवी भाऊसाहेब झांजे यांची निवड

**कडा! सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील वहिरा: येथील इंदुबाई रामचंद्र झांजे यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदाच्या निवडीसाठी ग्रामपंचायत कार्यालय वहिरा येथे बुधवार दि.२ एप्रिल रोजी ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या बैठकीत उपसरपंच म्हणून पल्लवी भाऊसाहेब झांजे यांची निवड करण्यात आली. वहिरा येथील उपसरपंच पद रिक्त झाले होते. या पदाच्या निवडीसाठी तहसील कार्यालयाच्या वतीने सर्व ग्रामपंचायत सदस्यांची विशेष बैठक ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपसरपंच पदासाठी पल्लवी भाऊसाहेब झांजे व सुवर्णा कचरू गाडे, या दोघींनी अर्ज दाखल केल्यामुळे प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले.



यावेळी ग्रामस्थ व ग्रामपंच्यात सदस्य व सरपंच उपस्थित होते. या मतदान प्रक्रियेत पल्लवी भाऊसाहेब झांजे यांना ७ तर सुवर्ण कचरू गाडे, यांना ३ सदस्यांची मते पडल्याने उपसरपंच म्हणुन पल्लवी भाऊसाहेब झांजे यांची निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी, व ग्रामसेवक एकशिंगे यांनी घोषित केले. यावेळी ग्रामसेवक, तलाठी व निवडणूक अधिकारी, आणि नवनिर्मित उपसरपंच पल्लवी भाऊसाहेब धनंजय यांचा सत्कार करण्यात आला. ही निवडणूक खेळीमेळीया वातावरण पार पडली.

एक काळ भलेही तो जमाना, कागदाचा होता,पण पत्रातल्या भावना मात्र दोन चार महिने ,सहज टिकायच्या. आजकाल आयुष्यभराच्या आठवणीसुद्धा , एका सेकंदात बोटाने 'डिलीट' होतात.
– प्रा.डॉ.घ.ना.पांचाळ




## आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरु श्री श्री श्री देवरदासी मैया यांची 1046 वी जयंती उत्साहात साजरी

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची १०४६ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. हा भव्य सोहळा श्री रामलिंग चौंडेश्वरी व नवनाथ महाराज मंदिर (गढीवर), कोष्टी गल्ली, अंबाजोगाई येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माता चौंडेश्वरी देवी व आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची सौ. सीमा प्रदीप वरवटकर महिलाअध्यक्ष महाराष्ट्र राज्य लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था महाराष्ट्र राज्य, शाखा अंबाजोगाई यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. या पावन सोहळ्यात समाजातील असंख्य बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या श्रद्धेचा आणि एकात्मतेचा ठेवा जपला. विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून श्री देवरदासी मैया यांच्या विचारांचा आणि शिकवणीचा महिमा उलगडण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी समाज एकता, आध्यात्मिक विचारधारा



आणि संस्कृतीच्या जतनाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. जयंती उत्सवाने समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करत, भक्तिभाव आणि प्रेरणादायी विचारांची जागृती घडवली. यावेळी सिमा शेंगोळे,मीराताई मसनाळे,रूक्मिणबाई रूघे, संजीवनी शेंगोळे,...अरूणा हरदास,अंजली उमराणे,किशोरी शेंगोळे,श्रद्धा मसनाळे यांच्यासह अंबाजोगाई लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था शाखा अंबाजोगाई चे अध्यक्ष नरसिंह कानडे,शुभंम मसनाळे,गणेश कानडे,राजेंद्र हाट्टे,विलास द्रुकर,संतराम घोळक, नारायण कानडे विष्णु मसनाळे,दिवाकर मसनाळे हनुमंतराव चौधरी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)